**कर आकारणी कर संकलन कार्यालय,**
**तथा एक खिडकी परवानगी कक्ष**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक -१३/०१/२०२६**

# <u>प्रेस नोट</u>

## <u>महापालिकेची अभय योजने अंतर्गत एका दिवसात ६० कोटी रुपयांची विक्रमी वसुली</u>

पुणे महानगरपालिका हद्दीत निवासी, बिगरनिवासी व मोकळया जागांची वर्षानुवर्ष कर न भरल्याने थकबाकी असलेल्या मिळकतींची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. तसेच थकबाकी असलेल्या मिळकतींवर दरमहा आकारण्यात येणाऱ्या मिळकतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ४१ अन्वये २% शास्ती आकारण्याची तरतूद आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मिळकतकराची थकबाकी निर्माण होत आहे.

मा. महापालिका आयुक्त यांनी पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मिळकतकर थकबाकी असणा-या मिळकतदारांसाठी शास्ती/दंडाच्या रक्कमेवर ७५% सूट देणेकामी "अभय योजना" दि. १५ नोव्हेंबर २०२५ ते १५ जानेवारी २०२६ अखेर जाहिर केली आहे. अभय योजनेचा लाभ संबंधित मिळकतदारांना मिळून मिळकतकर जमा होण्यासाठी कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत विशेष प्रयत्न करून जास्तीत जास्त कर भरणा वसुलीकडे लक्ष केंद्रीत केले होते. परिणामी आज दिनांक १३/१/२०२६ रोजी "अभय योजना" अंतर्गत एका दिवसात ६० कोटी रुपयांची विक्रमी वसुली झाली .आज अखेर एकूण २४२१ .६६/- रुपये जमा झाले आहेत. मागील वर्षी ३१ मार्च २०२५ अखेर २३४५.९० कोटी रुपये जमा झाले होते.

यापूर्वी जाहीर केलेल्या चार अभय योजने पैकी सन २०२० -२१ साली सर्वाधिक रक्कम रुपये ४८५.६७ कोटी जमा झाली होती. सदर योजनेचा कालावधी चार महिन्यांचा होता. या वर्षी दोन महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्याआधीच अभय योजना कालावधीत ६३६.३३ कोटी रुपये जमा झाले आहेत.

अभय योजनेचे अजूनही २ दिवस बाकी आहेत. सर्व थकबाकीदारांना आवाहन करणेत येत आहे की उर्वरित कालावधीत ऑनलाईन तसेच नागरी सुविधा केंद्र येथे मिळकतकर भरून २% शास्तीच्या रक्कमेवर देण्यात आलेल्या ७५% सवलतीचा लाभ घ्यावा. मिळकतदारांच्या सोयीसाठी नागरी सुविधा केंद्र सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येणार आहेत.

(रवि पवार)
उप आयुक्त तथा
कर आकारणी व कर संकलन प्रमुख
पुणे महानगरपालिका